# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०४/०६/२०२२ (शनिवार)**

**(सायंकाळ)**

---

### अकस्मात मृत्यू

**१) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील इंडोरामा कंपनी गेट क्र ६ समोर एमआयडीसी बोरी येथे दिनांक ०३/०६/२२ चे ०७.१५ वा. पुर्वी **श्रीधर महादेव पोईनकर(मृतक) वय ५२ वर्ष रा. कारघाटा ता. चिमुर जि चंद्रपुर** हा दारू पिण्याचे सवयीचा असुन त्याने दारूचे अती सेवन केल्याने तो मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– दर्शन श्रीधर पोईनकर, वय २२ वर्ष रा. कारघाटा ता. चिमुर जि चंद्रपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सहायक फौजदार अशोक तरमळे मो.नं. ९९२३६९९१८५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत १६ कि.मी. अंतरावरील मौजा कलंभा येथे दिनांक ०१/०६/२२ चे १२.३० वा. दरम्यान **हिमांशु गजानन मडावी (मृतक) वय १८ वर्ष रा.उमरी ता.रामटेक** याने आपल्या राहते घरी कोणतेतरी विषारी औषध प्राशन केले. त्याच्या तोंडातुन फेस बाहेर पडत असल्याने तेथील लोकांनी त्यास योगिराल हॉस्पिटल रामटेक येथे भरती केले. त्याची प्रकृती जास्त खराब झाल्याने त्यास राधाकृष्ण हॉस्पीटल वर्धमान नगर नागपुर येथे रेफर केल्याने त्याचे घरच्या लोकांनी राधाकृष्ण हॉस्पीटल वर्धमान नगर, नागपुर येथे नेले असता उपचार दरम्यान दुपारी ०३.०५ वा.मरण पावला.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस शिपाई नितीन सुरेश तायडे पो.स्टे. लकडगंज नागपुर शहर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री तिवारी मो.क्र. ९८२३८५५२०९ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. वेलतुर**:– अंतर्गत २५ कि.मी. अंतरावरील मौजा हरदोली राजा येथे दिनांक ०३/०६/२०२२ चे १३.०० वा. दरम्यान **निलेश गोपाल गडपायले (मृतक), वय २६ वर्ष, रा.हरदोली राजा,ता.कुही** हा जुगार खेळण्याच्या सवईचा होता. त्याच्या घरचा सर्व कारभार हा तोच सांभाळत होता. त्याने बँक ऑफ इंडिया शाखा मांढळ येथून वडिलांचे नावावर ७२,०००/–रु. चे कर्ज घेतले होते व त्याचे आजपर्यंत काहीच पैसे भरलेले नाहीत. त्यानंतर ट्रॅक्टर घेण्यासाठी त्याने आय.सी.आय.सी.आय.बँक नागपूर येथून फिर्यादीचे नावावर ६,५०,०००/–रु.चे कर्ज घेतले होते. त्या कर्जाचा हप्ता ८६,०००/–रु. पुढच्या महिण्यामध्ये ७ वी कीस्त भरायची होती. परंतु त्याला जुगार खेळण्याची सवय असल्याने त्याचे नातेवाईक यांच्याकडे बँकेची कीस्त भरण्याकरिता पैसे नसल्याने त्याने आपले राहते घरी आपले मनावर परिणाम घेवून विषारी औशध प्राषन केले. त्यास उपचाराकामी प्रथम पि.एच.सि.मांढळ व नंतर ग्रामिण रुग्णालय कुही येथे नेले असता उपचारापुर्वी डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी नामे— गोपाल मोतीराम गडपायले, वय ५५ वर्ष, रा.हरदोली राजा, ता.कुही यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार रविन्द्र फरकाडे मो.नं. ९८२२७६७८३३ हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत पिंडकापार ता.रामटेक येथे दिनांक ०३/०६/२०२२ चे १६:०० वा. दरम्यान **राहुल कोठीराम चनेकार(मृतक) वय २५ वर्ष रा.पिंडकापार ता.रामटेक** याने आपले राहते घरी आड्याला लाकडी फाट्याला ओढणीने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला. त्याला सरकारी दवाखण्यात नेले असता डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषित केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— कार्तिक उमराव चनेकार वय ४२ वर्ष रा. पिंडकापार यांचे रिपोर्ट वरून पो. स्टे. रामटेक येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री तिवारी मो.नं. ९८२३८५५२०९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**